# प्रेसनोट

दि.८/११/२०२१

**Nationalised बॅकेचे Fake Web Page बनवुन बँक ग्राहकांची आर्थिक फसवणुक करणा-यास अटक**

| | | |
|---|---|---|
| १. | पोलीस ठाणे | पश्चिम विभाग सायबर पोलीस ठाणे, बांद्रा कुर्ला कॉप्लेक्स, मुंबई. |
| २. | गु.र.क्र. व कलम | ४४/२०२१ कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१ भादवि सह कलम ६६(C), ६६(D) माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००८ |
| ३. | फिर्यादी नाव | श्री. किरण व्यंकटेश्वरराव मराजू |
| ४. | गुन्हा घडला दिनांक | ऑगस्ट २०२१ रोजी ते अदयापपर्यंत. |
| ५. | गुन्हा दाखल दिनांक | दिनांक २२/१०/२०२१ रोजी |
| ६. | गुन्हयाचे घटनास्थळ | इंटरनेटच्या माध्यमातुन |
| ७. | अटक आरोपी | सोहराब अनाउलमियॉ अंसारी, मुस्लिम/२६ वर्षे, झारखंड |
| ८. | तपासी अधिकारी | पोलीस निरिक्षक, मौसमी पाटील |

काही अज्ञात इसमांनी Nationalised बॅकेचे अधिकृत प्रतिनिधी असल्याचे भासवुन २१०० पेक्षा अधिक वेगवेगळया मोबाईल क्रमांकावरुन अंदाजे ३५०० पेक्षा जास्त खोट्या URL Links हया 'Dear Customer your ***** BANK A/C has been Suspended. Please Update your KYC immediately. click hear link xxxxxxxxxxxxxxxxx.' अश्याप्रकारच्या Bulk SMS द्वारे भारताच्या विविध भागातील अनेक बँक ग्राहकांना पाठविल्या असल्याचे दिसुन आले. सदर URL Link ही Click केली असता Nationalised बँकेचे नाव व लोगो असलेली व बँकेच्या Original वेबसाईटसारखी दिसणारी बनावट वेबसाईट Open होते. काही अज्ञात इसमांनी सदर बनावट वेबसाईटव्दारे बँकेच्या ग्राहकांना ऑनलाईन व्यवहारासंबंधी व इतर वैयक्तीक संवेदनशील माहिती भरायला भाग पाडुन सदर माहितीचा गैरवापर करुन ग्राहकांची आर्थिक फसवणुक केली तसेच Nationalised बँकेची बदनामी केली म्हणुन सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयामध्ये तांत्रिक व पारंपारीक तपास करुन मुख्य आरोपी सोहराब अनाउलमियॉ अंसारी, मुस्लिम/२६ वर्षे यास गाव मार्गोमुंडा, जि. देवघर, झारखंड राज्यातुन अटक करण्यात आली आहे. त्यांचे ताब्यातुन २ लॅपटॉप, ६ मोबाईल, १ हार्डडिस्क, ८ सिम कार्ड जप्त करण्यात आले आहेत. यातील आरोपींचे झारखंड,बिहार परिसरात मोठे रॅकेट असुन त्यांचा शोध घेण्याचा गुन्हयाचा तपास चालु आहे.

आजकालच्या डिजीटल युगात इंटरनेटचा वापराद्वारे ऑनलाईन व्यवहारांचे वाढते प्रमाण पाहता KYC Update करून घेण्याकरिता, विविध Lottery, Prizes जिंकली आहे असे सांगुन विविध बँका, मोबाईल सर्व्हिस प्रोव्हायडर कंपन्या, इन्शुरन्स कंपन्या व संबधित कंपन्यांचे अधिकृत प्रतिनिधी असल्याचे भासवुन Bulk SMS पाठविले जातात. सदर SMS मध्ये एखादी लिंक अथवा संपर्कक्रमांक दिला जातो. अश्या URL Link किंवा संपर्क क्रमांकावर कधीही ऑनलाईन व्यवहारासंबधी व इतर वैयक्तीक संवेदनशील माहिती कधीही देवु नका असे आवाहन मुंबई पोलीसांतर्फे करण्यात येत आहे.

सदरची प्रभावी कामगिरी मा. पोलीस सह आयक्त (गुन्हे) श्री. मिलींद भारंबे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. विरेश प्रभु, मा. पोलीस उप आयुक्त, सायबर गुन्हे, डॉ. रश्मी करंदीकर याच्या निगराणीखाली मा. सहा. पोलीस आयुक्त, सायबर विभाग, श्री. नितीन जाधव यांच्या मागदर्शनाखाली पश्चिम विभाग सायबर पोलीस ठाणेचे पोनि मौसमी पाटील, पोउनि अनिकेत कडु, पोउनि अजय पाटील, पोशिक्र ११०३२३/संग्राम जाधव यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे.